दयानंद कला महाविद्यालयात ' लातूर शहराचा पाणी विषयक सर्वे 2019 कार्यक्रम ' संपन्न .

लातूर .दि 17.येथील दयानंद कला महाविद्यालयाच्या विद्यार्थी शिक्षक पालक संघ आणि भूजल सर्वेक्षण व विकास यंत्रणा लातुर यांच्या संयुक्त विद्यमाने "लातूर शहराचा पाणीविषयक अभ्यास सर्वे 2019 कार्यक्रम" संपन्न झाला. या कार्यक्रमाच्या अध्यक्षस्थानी प्राचार्य डॉ. शिवाजीराव गायकवाड उपस्थित होते .कार्यक्रमाचे प्रमुख पाहुणे म्हणून श्री. योगेश पाच्छापूरकर सहायक भूवैज्ञानिक उपस्थित होते .तसेच प्रमुख उपस्थिती म्हणून डॉ. अनिल जायभाय उपस्थित होते. कार्यक्रमाचे प्रास्ताविक डॉ. रामेश्वर खंदारे यांनी केले .
कार्यक्रमाचे प्रमुख पाहुणे योगेश पाच्छापूरकर यांनी भूजल विकास यंत्रणा प्रकाश टाकला यावेळी बोलताना ते म्हणाले की लातूरमध्ये पाण्याची कमतरता नसून लातूरमध्ये मोठ्या प्रमाणात पाण्याचा गैरवापर होतो त्यांनी विद्यार्थ्यांना आवाहन केले की पाणी हे सजीवांसाठी अमूल्य आहे त्यामुळे पाण्याचा योग्य वापर केला पाहिजे .यावेळी प्रमुख उपस्थिती म्हणून उपस्थित असलेले डॉक्टर अनिल जायभाय यांनी विद्यार्थ्यांना मार्गदर्शन केले .याप्रसंगी बोलताना ते म्हणाले की भूजल पातळी वाढायला हवी त्यासाठी सरकारच्या 'पाणी आडवा पाणी जिरवा' यासारख्या योजनांची अंमलबजावणी झाली पाहिजे लातूरमधील उपलब्ध पाणी पाण्याचा गैरवापर पाण्याची उपयोगिता यासाठी हा सर्व्हे घेण्यात आला असे ते म्हणाले .कार्यक्रमाचा अध्यक्षीय समारोप प्राचार्य डॉ. शिवाजीराव गायकवाड यांनी केला .
कार्यक्रमाचे सूत्रसंचालन कु . अश्विनी शेंडगे या विद्यार्थिनीने केले .कार्यक्रमाचे आभार कु .सुप्रिया पाटील या विद्यार्थिनीने मानले .कार्यक्रमाच्या यशस्वीतेसाठी श्री मनोज आत्रम श्री परमेश्वर मुंडे , श्री.विष्णू चांदुरे प्रा.डॉ. शिवशंकर कसबे , संभाजी कांबळे, शाम बोराडे यांनी परीश्रम घेतले .